**<u>प्रेसनोट</u>** **दिनांक ०७/११/२०२३**

**"दुकान फोडून चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक करून मालमत्ता हस्तगत केलेबाबत "**

दि. ०२/११/२०२३ रोजी रात्री ०९.०० वा. पासनु ते दि. ०३/११/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा. च्या दरम्यान त्यांच्या कॅसाबेला बिल्डींग, शॉप नं. ०१, ए-विंग, प्लॉट नं. ६८२, १५ व्या रस्त्याच्या कॉर्नरला, खार पाली रोड, मुंबई या बंद असलेल्या शॉपच्या किचनच्या खिडकीची लोखंडी जाळी तोडुन कोणीतरी अज्ञात इसमाने शॉपच्या आतमध्ये प्रवेश करून एकुण अंदाजे किंमत रूपये ६३,८१,०००/- किंमतीचे दागिणे व रोख रक्कम चोरी केली आहे, म्हणुन फिर्यादी श्रीमती वर्षा मिरचंदानी यांनी तक्रार दिल्याने खार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८९९/२०२३ कलम ४५४, ४५७, ३८० भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या आजपावेतो केलेल्या तपासावरून सदरचा गुन्हा हा आरोपी १) गुलाब गणेश मारवाडी उर्फ अक्षय, वय २५ वर्षे, २) सुर्या मनी नाडर, वय २१ वर्षे, ३) प्रयास संजय केदारे, वय १९ वर्षे यांनी केला असल्याचे निष्पन्न झालेने त्यांना अटक करण्यात आली असून त्याच्याकडून गुन्ह्यात चोरीस गेलेली सोन्या-चांदीचे हिरेजडीत दागिने एकुण अं.कि.रू. ४०,६९,५८०/- किमतीचे तसेच गुन्ह्यात वापरलेली बजाज कंपनीची पल्सर मो/सायकल अं.कि.रू. ७५,०००/- असा एकुण अं.कि.रू. ४१,४४,५८०/- किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

खार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. श्री.अविनाश नडविनकेरी व पो.उ.नि. श्री.प्रदिप पाटील, स.पो.उ.नि. श्री.मनोज वैद्य आणि गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.ह. श्री. भरत काच्चे, पो.ह. श्री. दिनेश शिर्के, पो.ह. श्री.महेश मुळे, पो.ह. श्री.आनंद निकम, पो.शि. श्री. योगेश तोरणे, पो.शि. श्री.विशाल जाधव, पो.शि. श्री.राहुल पाटील, पो.शि. श्री.महेश लहामगे, पो. शि. श्री.अजीत जाधव, पो.शि. श्री.मारूती गळवे, पो.शि. श्री.मनोज हांडगे व पो.शि. श्री.केदारनाथ शिंदे यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

-------oo--------